महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# ऑनलाइन विश्व संमेलनात ८० हजारजण सहभागी

पुणे , म. टा. प्रतिनिधी

आगळ्या-वेगळ्या पद्धतीने वेबसाईटवर घेण्यात आलेल्या ऑनलाईन बुकगंगा विश्व साहित्य संमेलनाला सर्वच क्षेत्रातील नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. जगभरातील सुमारे ८० हजार वाचक , साहित्यिक , लेखक-कवी , ब्लॉगर , विद्यार्थी या संमेलनात सहभागी झाले.

भारतासह अमेरिका , कॅनडा , युरोप , दुबई , सिंगापूर आणि ऑस्ट्रेलिया आदी देशातील साहित्य रसिकांचा सहभाग असणारे हे एकमेव संमेलन ठरले. त्यात आठशे कवींनी कविता सादर केल्या , शंभर ब्लॉगर्सनी ब्लॉगच्या लिंक पोस्ट केल्या , २५० आवडत्या पुस्तकांची नोंद झाली , ३५० आवडत्या लेखकांची नावे नोंदविण्यात आली , ६० प्रकाशकांची नावे सुचविण्यात आली तर ७५ वाचकांनी आवडत्या पुस्तकातील उतारे सादर केले अशी माहिती संयोजक मंदार जोगळेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ऑनलाईन व्होटिंग पद्धतीने घेण्यात आलेल्या पुरस्कारांसाठी सहभागी वाचकांनी सुहासभाई मुळे (आवडता लेखक) , बिना सातोस्कर (आवडती कविता) , अनमोल प्रकाशन पुणे (आवडते प्रकाशक) , सुहासभाई मुळे यांचे मॉर्निंग टॉक (आवडते पुस्तक) , प्रशांत रेडकर (आवडता ब्लॉगर) , अमोल तावरे (चोखंदळ वाचक) आदींची पुरस्कारांसाठी निवड केली. प्रत्येकी दहा हजार एक रुपयांचा पुरस्कार विजेत्यांना त्यांच्या शहरात जाऊन दिला जाणार आहे.